MHAU080027942024

**भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. ७१/२०२४**
**दगा माळी –विरुध्द– जिल्हाधिकारी व इतर.**

**निशाणी क्र. १७ खालील आदेश**

१) प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे भुसंपादन निर्देशन अर्ज दुरुस्तीकामी दाखल केलेला आहे. गैरअर्जदारांनी नि.क्र. १८ वर त्यांचे म्हणणे सादर करुन अर्ज मंजुरीस आक्षेप घेतलेला आहे.

२) अर्जदारांच्या अर्जातील संक्षिप्त कथन खालीलप्रमाणे –

भुसंपादन निर्देशन अर्ज सादर करतांना नि.क्र. ०१ मध्ये गैरअर्जदारांना क्रमांक देतांना तफावत झाली असुन ती दुरुस्ती करण्याकामी परवानगी मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणे गरजेचे आहे व तशी वस्तुस्थिती अभिलेखावर येणे गरजेचे आहे. न्यायाच्या दृष्टीने अर्जदारास तशी दुरुस्ती परवानगी मिळण्याची विनंती वादीने केली आहे.

३) गैरअर्जदारांनी आपले म्हणणे सादर करून आक्षेप घेतला. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा प्रकरण लांबवण्याकामी सादर केलेला आहे, अर्ज दखलपात्र नाही. त्यामुळे अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करावा.

४) प्रस्तुतचा भुसंपादन निर्देशन अर्ज भुसंपादन नुकसानभरपाई कामी सादर केलेला आहे. अर्जदाराने प्रस्तुतच्या अर्जामध्ये जे कथन केले ती दुरुस्ती तांत्रीक स्वरुपातील दिसून येते. भुसंपादन अर्जातील कथन सिध्द करण्याची जबाबदारी अर्जदारावर आहे. अद्याप अर्जदारांचा पुरावा संपणे बाकी आहे. गैरअर्जदारांना अर्जदाराचे साक्षीदारांची उलटतपास घेण्याची पूर्ण संधी आहे. अर्जदार हे खरोखरच

नुकसानभरपाईस पात्र आहेत की नाही हे दोन्ही बाजूनी दिलेल्या सक्षम पुराव्यावरुन ठरेल. अर्जातील नमुद कारण पाहता अर्जदारांनी केलेल्या विनंतीप्रमाणे दुरुस्ती आवश्यक दिसून येते. जरी भुसंपादन निर्देशन अर्ज दुरुस्त केला तरी भुसंपादन निर्देशन अर्जाचे स्वरुप व कथन बदलत नाही. अर्जदारांची जी मागणी आहे तीच मागणी कायम राहते. तसेच गैरअर्जदारांच्या बचावातही फरक पडत नाही. प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याकरिता व न्यायाच्या दृष्टीने व अर्जातील नमुद कारण पाहता अर्ज मंजुरीस सबळ कारण दिसते. करिता, आदेश.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज (नि.क्र. १७) खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदारांनी भुसंपादन निर्देशन अर्जात दुरुस्ती १४ दिवसाच्या आत किंवा त्यापूर्वी करावी.

Digitally signed by SUSHIL SHARADRAO DESHMUKH
Date: 2025.07.18 16:24:49 +0530

(सु. श. देशमुख)

दि.१८.०७.२०२५ दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), सिल्लोड.